# मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# शहर स्वच्छतेसाठी नागरिकांनी ओला-सुका कचरा स्वतंत्र द्यावा!

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाचे आवाहन; नियम न पाळणाऱ्यांवर कारवाई

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड शहरातील अनेक नागरिक कचरा वर्गीकरणाचे नियम पाळत असले तरी, अद्यापही काही भागांमध्ये ओला व सुका कचरा एकत्र दिला जात आहे. त्यामुळे नागरिकांनी ओला व सुका कचरा वर्गीकरणाबाबत असणारे नियम पाळून सहकार्य करावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

घनकचरा व्यवस्थापन अधिनियमानुसार प्रत्येक नागरिकाने घरगुती तसेच व्यावसायिक कचऱ्याचे वर्गीकरण करून देणे बंधनकारक आहे. या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. या उपक्रमांमधून नागरिक, विद्यार्थी आणि व्यावसायिकांमध्ये ‘कचरा विलगीकरण हीच खरी स्वच्छतेची गुरुकिल्ली आहे’ अशी जाणीव दृढ केली जात आहे.




तसेच महापालिकेने कचरा विलगीकरणाच्या दृष्टीने सोसायट्या आणि संस्थांना दोन वेगवेगळ्या रंगांचे डबे उपलब्ध करून दिले असून त्यांचा योग्य वापर केल्यास कचऱ्याचे प्रभावी वर्गीकरण होईल. या प्रक्रियेमुळे पुढील टप्प्यांमध्ये कंपोस्टिंग, पुनर्वापर आणि पुनर्निर्मिती सुलभ होईल. त्यामुळे नागरिकांनी ओला व सुका कचरा वर्गीकरण करून स्वच्छ, आरोग्यदायी व पर्यावरणपूरक शहरनिर्मितीत सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

**निरीक्षण पथकांची नियुक्ती**

महापालिकेच्या आरोग्य विभागाने यासाठी स्वतंत्र निरीक्षण पथके नियुक्त केली आहेत. ही पथके दररोज कचरा संकलनावेळी विलगीकरणाची तपासणी करतात. विलगीकरण न करणाऱ्या नागरिकांवर, सोसायट्यांवर किंवा व्यावसायिक आस्थापनांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे.

### कचऱ्याचे प्रकार आणि वर्गीकरण

- » ओला कचरा : भाजीपाल्याच्या साली, अन्नाचे उरलेले तुकडे, फुलांचा कचरा, बागेतील पाने व अन्य जैविक कचरा.
- » सुका कचरा : प्लास्टिक, कागद, धातू, बाटल्या, पॅकेजिंग साहित्य, थर्माकोल व इतर पुनर्वापरयोग्य वस्तू.
- » घरगुती घातक कचरा : ट्यूबलाईट, बॅटऱ्या, बल्ब, तुटलेल्या धारदार वस्तू, केमिकल्स, इंजेक्शन, जैववैद्यकीय कचरा.
- » सॅनिटरी कचरा : सॅनिटरी पॅड्स, डायपर्स, बँडेजेस.
- » ई-कचरा : खराब संगणक, लॅपटॉप, सीपीयू, टेलिव्हिजन संच, इलेक्ट्रिक व इलेक्ट्रॉनिक वस्तू इत्यादी.

> पिंपरी चिंचवड स्वच्छ व सुंदर ठेवणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. नागरिकांनी कचरा वर्गीकरणाचे नियम पाळून सहकार्य करावे, जेणेकरून शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी आणि पर्यावरणपूरक होईल.
>
> **- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

> पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनाने स्वच्छतेसाठी अनेक उपक्रम राबवले आहेत, परंतु नागरिकांचा सक्रीय सहभाग सर्वात महत्त्वाचा आहे. प्रत्येक घर आणि संस्थेने जबाबदारपणे कचरा विलगीकरण केल्यास आपले शहर ‘स्वच्छतेचा आदर्श’ ठरेल.
>
> **- डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

---

# निलेश नेवाळे यांच्या पुढाकारातून घरगुती एमएनजीएल गॅस लाईनच्या कामाचा शुभारंभ

## प्रभाग क्रमांक 11 मधील चिखली, शरदनगर, सुदर्शननगर परिसराचा समावेश

**पिंपरी | प्रतिनीधी**

प्रभाग क्रमांक ११ मधील चिखली, शरद नगर आणि सुदर्शन नगर परिसरात भाजपाचे युवा नेतृत्व निलेश मधुकर नेवाळे यांच्या पुढाकारातून आणि आमदार महेश लांडगे यांच्या सहकार्याने घरगुती MNGL गॅस पाईप लाईनच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

चिखली, नेवाळे वस्ती, पूर्णानगर प्रभाग क्र.११ मधील भाजपचे संयमी आणि अभ्यासू नेतृत्व अशी निलेश नेवाळे यांची ओळख आहे. प्रभागाच्या सर्वांगीण विकासाकरिता भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली निलेश नेवाळे विविध उपक्रम तसेच सुविधा नागरिकांकरिता उपलब्ध करून देत असतात.



शरदनगर, सुदर्शननगर चिखली येथे घरगुती MNGL गॅस पाईप लाईनच्या कामाचा शुभारंभ आमदार महेश लांडगे यांच्या सहकार्याने आणि सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे यांच्या पाठपुराव्यातून करण्यात आला. बऱ्याच दिवसापासून घरगुती गॅस पाईप लाईनची मागणी या परिसरातील नागरिकांची होती. सदर काम मार्गी लागल्यामुळे सर्व नागरिकांमध्ये उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण आहे.

या MNGL गॅस पाईपलाईन कामाच्या शुभारंभ वेळी शरदनगर आणि सुदर्शननगर मधील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी विशेषतः गृहिणीमधे मोठा उत्साह दिसून आला. याप्रसंगी प्रभाग क्र.११ मधील भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी आणि सहकारी उपस्थित होते.

# वाकड ते मामुर्डी रस्ता होणार 'सुसाट'!

## रावेत, पुनावळे, ताथवडे, वाकड अंडरपास आणि सेवा रस्त्यांच्या कामाला गती

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड मतदार संघातून जाणारा मुंबई बंगळुरूमहामार्गावरील वाकड, पुनावळे, ताथवडे, मामुर्डी, रावेत आणि किवळे परिसरातील सेवा रस्त्या संदर्भातील कामांसाठी आमदार शंकर जगताप यांनी पुढाकार घेतला आहे. या सेवा रस्त्यांची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यात यावी. आवश्यक ठिकाणी जागा हस्तांतरित करून मूलभूत सेवा सुविधांची विकास कामे देखील पूर्ण करावी अशा सूचना देखील आमदार शंकर जगताप यांनी केल्या आहेत.

यामध्ये प्रामुख्याने मुळा नदी ते भुमकर चौक आणि भुमकर चौक ते मुळा नदी हा गोल सर्कल हा मार्ग प्राधान्याने पूर्ण केला जावा . यामधील पावसाळी पाणी निचरा, सांडपाणी निचरा व्यवस्था, विविध सेवा वाहिन्यांसाठी डक्ट सुविधा तयार करण्यासाठी प्राधान्य द्यावे यांसारख्या सूचना देखील आमदार जगताप यांनी दिल्या आहेत.

चिंचवड मतदार संघातील पिंपळे गुरव येथील कार्यालयात आमदार शंकर जगताप यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांसमवेत महत्त्वाची आढावा बैठक घेतली.



यावेळी वाकड, पुनावळे, ताथवडे, मामुर्डी, रावेत आणि विकासनगर या भागातील सेवा रस्त्यांच्या कामांना गती देण्याचे निर्देश यावेळी आमदार जगताप यांनी दिले. यावेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम, तांत्रिक व्यवस्थापक अंकित यादव, कार्यकारी अभियंता सुभाष घंटे, समन्वयक विनोद पाटील, तसेच हरिंद्र यादव आदी उपस्थित होते.

आमदार शंकर जगताप यावेळी म्हणाले, चिंचवड मतदार संघात येणाऱ्या ताथवडे, पुनावळे, रावेत, वाकड परिसराची देखील झपाट्याने वाढ झाली आहे. या परिसरात अनेक आयटी कंपन्या व मोठ्या रहिवासी सोसायटी आहेत. त्यातच हा परिसर हिंजवडी आयटी पार्कला लागून असल्याने नागरिक या परिसरात वास्तव्यास पसंती देत आहेत. येथे नागरी वस्ती मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे नागरिकांना वाहतुकीच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. पुनावळे, ताथवडे, वाकड येथील सब वे , मुंबई बेंगलोर हायवे लगत असणारा सर्व्हिस रस्ता हा या परिसरातील शालेय विद्यार्थी, आयटी, व औद्योगिक कामगार वर्ग, महिला, जेष्ठ नागरिक यांच्या रोजच्या प्रवासासाठी महत्वाचा आहे. त्यामुळे या परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी उपाययोजना करणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे या परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी उपाययोजना करणे महत्त्वाचे आहे. या अनुषंगाने आजची बैठक घेण्यात आली. चिंचवड मतदार संघातून जाणारा मुंबई- बंगळुरू महामार्ग आणि सेवा रस्ता हा राज्य शासन, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अंतर्गत येतो. येथील सबवे व रस्ता राज्य शासन व केंद्र सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या (मॉर्थ) यांच्या कार्यक्षेत्रात येत आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेऊन सूचना केल्या.

यावेळी आमदार जगताप म्हणाले, भुमकर चौक ते ताथवडे , ताथवडे ते पुनावळे अंडरपास येथील सेवा रस्त्यांचे तात्काळ डांबरीकरण करून देण्यात यावे. या माध्यमातून वाहतूक सुरळीत राहील आणि नागरिकांना कोणतेही प्रकारचा त्रास आणि वाहतूक कोंडी होणार नाही. रस्ते चांगले असल्यास येथील वाहतुकीचा स्पीड देखील वाढेल. येथील रस्त्यांच्या कामांसाठी ज्या जागा अद्याप ताब्यात आलेल्या नाही यासंदर्भात जागामालक शेतकरी यांच्याशी संपर्क साधण्यात आला आहे . राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसमवेत या जागामालकांनी चर्चा केली असून, भूसंपादनाचा विषय देखील मार्गी लावण्यात आला आहे. या रस्त्यांची गुणवत्ता अतिशय उच्च दर्जाची राखण्यात यावी. पुढील पन्नास वर्षाचे व्हिजन या कामांसाठी दिले जावे. जेणेकरून भविष्यात वारंवार रस्त्यांच्या गुणवत्तेचे प्रश्न उपस्थित राहू नये असे अशा सक्त सूचना केल्या असल्याचे आमदार जगताप यांनी सांगितले. पुनावळे, ताथवडे, वाकड अंडरपास येथे "बॉक्स पुशअप" बसवण्यासंदर्भात तात्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बैठक घेण्यात येणार आहे, त्यानंतर तातडीने निविदा काढून हे काम पूर्ण करण्यात येईल असे देखील जगताप यांनी सांगितले.

> राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांसमवेत आज महत्त्वाची आढावा बैठक घेतली. वाकड, पुनावळे, ताथवडे, मामुर्डी, रावेत आणि विकासनगर या भागातील सेवा रस्त्यांच्या कामांना गती देण्याचे निर्देश यावेळी अधिकाऱ्यांना दिले आहेत. मुंबई- बंगळुरू महामार्ग आणि सेवा रस्ता हा राज्य शासन, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अंतर्गत येतो. येथील सबवे व रस्ता राज्य शासन व केंद्र सरकारच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या (मॉर्थ) यांच्या कार्यक्षेत्रात येत आहे. या ठिकाणी महापालिका काम करू शकत नाही. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांनी तातडीने रस्त्यांची कामे पूर्ण करावी अशा सूचना केल्या.
>
> **- शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा.**

# रूपीनगरमधील ड्रेनेज समस्याने नागरिक त्रस्त

## ड्रेनेज लाईन दुरुस्तीला विलंब; महापालिकेच्या निष्क्रियतेवर नागरिक संतप्त

**पिंपरी | प्रतिनीधी**

रूपीनगर, सहयोगनगर, गणेशनगर आणि त्रिवेणीनगर परिसरात ड्रेनेज समस्यांनी नागरिक त्रस्त झाले आहेत. ड्रेनेज चेंबर तुटणे, पाइपलाइन फुटणे किंवा ब्लॉक होणे, तसेच योग्य ड्रेनेज व्यवस्थेचा अभाव यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते, डासांची पैदास होते आणि नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो. त्यामुळे लवकरात-लवकर ड्रेनेज समस्या मार्गी लावा अशी मागणी करण्यात येत आहे.



तळवडेतील या भागांची रहिवाशी संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. वाढत्या लोकसंख्येचा ताण मुलभूत सोयी-सुविधांवर आला आहे. विशेषतः पाणी, वीज, ड्रेनेज लाईनची क्षमता अपुरी पडत आहे. त्यात वर्षानुवर्ष महापालिका प्रशासनाकडून ड्रेनेज लाईनचे काम केलेले नाही. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागतो आहे.

> रूपीनगर परिसरात ड्रेनेज लाईन चे पाणी रस्त्यावर, घराच्या दारांवर साचले जाते. त्यावर डासांचा प्रादुर्भाव, दुर्गंधीचा त्रास नागरिकांना सहन करावा लागतो. यासोबत नागरिकांना आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे संबधिंत विभागाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन समस्या मार्गी लावावी. **- शितल वर्णेकर, स्थानिक.**

> परिसरात अनेक ठिकाणी ड्रेनेज लाईन फुटल्याने, दुर्गंधीयुक्त पाणी रस्त्यावर येते. आरोग्याच्या समस्या निर्माण होतात, महापालिकेकडे या समस्येबाबत तक्रार केल्यानंतरही दुर्लक्ष केले जाते. संबधिंत विभागाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन ही कामे मार्गी लावावी.
>
> **- सुखदेव नरळे, स्थानिक.**

> परिसरातील ड्रेनेज समस्याची पाहणी करून, समस्या मार्गी लावण्याचा प्रयत्न करतो. नागरिकांच्या तक्रारी कानावर आल्या आहेत. प्रत्यक्षात पाहणी करून चेंबर, ड्रेनेज दुरुस्ती करून घेतो.
>
> **- अनिल गडदे, फ प्रभाग जलनिस्सारण विभाग.**

# पुण्यातील मिळकतकर थकबाकीदारांना मिळणार चक्क 75 टक्के सवलत

## नागरिकांकडे असलेली मिळकतकराची थकबाकी वसूल करण्यासाठी अभय योजना राबविण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

नागरिकांकडे असलेली मिळकतकराची थकबाकी वसूल करण्यासाठी अभय योजना राबविण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. १५ नोव्हेंबर ते १५ जानेवारी या दोन महिन्यांच्या कालावधीसाठी 'अभय योजना' राबविली जाणार आहे. यासाठी थकबाकीच्या दंडावर ७५ टक्के सवलत मिळणार आहे. यापूर्वीच्या 'अभय योजने'चा लाभ घेतलेल्या थकबाकीदार मिळकतदारांना मात्र याची सवलत दिली जाणार नाही. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी अभय योजना राबिणार असल्याची माहिती दिली.

महापालिकेची मिळकरदारांकडे सुमारे बारा हजार कोटी रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये ३ हजार १५८ कोटी मुळ मिळकतकराची थकबाकी असून, त्यावर दंडाची रक्कम ९ हजार कोटी रुपयांची आहे. वर्षानुवर्षे हा मिळकतकर थकीत असल्याने महापालिका प्रत्येक महिन्याला त्यावर दोन टक्के व्याज आकारते. परिणामी, थकबाकीची रक्कम वाढतच असल्याचे समोर आले आहे. ही थकबाकी वसूल करण्यासाठी महापालिका प्रशासनाने 'अभय योजना' राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

यामुळे प्रलंबित थकबाकी वसूल होऊन महापालिकेच्या तिजोरीत निधी जमा होईल, असे महापालिका आयुक्त राम यांनी सांगितले. यावेळी अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी, मिळकतकर विभागाचे उपायुक्त अविनाश सपकाळ उपस्थित होते.

ही योजना आणताना यापूर्वीच्या 'अभय योजने'चा फायदा घेत थकबाकी भरलेल्या आणि पुन्हा थकबाकीदार झालेल्या मिळकतदारांना याचा फायदा देऊ नये, अशी मागणी सजग नागरिक मंचाचे विवेक वेलणकर यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे केली होती. 'या मागणीची दखल घेऊन नियमित मिळकतकर भरणाऱ्यांवरदेखील कोणताही अन्याय होणार नाही.

महापालिकेची प्रलंबित थकबाकी वसूल करण्यासाठी 'अभय योजना' आणण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. त्याची अंमलबजावणी १५ नोव्हेंबरपासून सुरू केली जाईल. यासाठीचा प्रस्ताव स्थायी समितीत मांडून मंजुरी दिली जाणार आहे,' असे आयुक्त राम यांनी सांगितले.

महापालिकेने यापूर्वी राबविलेल्या 'अभय योजने'त एकूण १ लाख ४० हजार ४३७ मिळकतदारांना सवलत दिली गेली. त्यांना यावेळी वगळले जाणार आहे. महापालिकेत समाविष्ट झालेल्या गावांसाठी देखील ही योजना लागू राहणार आहे. नागरिकांकडे असलेली मिळकतकराची थकबाकी वसूल करण्यासाठी अभय योजना राबविण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. १५ नोव्हेंबर ते १५ जानेवारी या दोन महिन्यांच्या कालावधीसाठी 'अभय योजना' राबविली जाणार आहे.




### दंडाच्या रक्कमेत ७५ टक्के सवलत

» थकबाकीदारांकडे एकूण १२ हजार १६१ कोटी रुपयांची थकबाकी आहे. महापालिका थकबाकीवर दोन टक्के इतका दंड घेते. प्रत्यक्षात या मिळकतदारांकडे ३ हजार १५८ कोटी रुपये इतकी थकबाकी आहे तर दंड सुमारे ९ हजार २ कोटी रुपये इतका आहे. 'अभय योजने'त मूळ मिळकतकरात कोणतीही सवलत दिली जाणार नाही, असे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### 'सरसकट फायदा'

» 'अभय योजने'चा फायदा घरगुती, व्यावसायिक अशा सर्व मिळकतदारांना होणार असून, दंडाच्या रकमेत ७५ टक्के सवलत मिळणार आहे. दंडाची रक्कम कितीही असली, तरी त्यावर ही सवलत लागू असेल, असे आयुक्तांनी सांगितले.

> महापालिकेची मिळकतदारांकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे. ही थकबाकी वसूल करून त्यामधून 'मिसिंग लिंक' तसेच इतर महत्त्वाच्या प्रकल्पांची कामे मार्गी लागावीत, यासाठी निधी उपलब्ध होणार आहे. महापालिकेने अभय योजनेतून ५ हजार ४०८ कोटी रुपये इतका मिळकतकर वसूल करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.
>
> - नवल किशोर राम, आयुक्त, पुणे महापालिका

# हिंजवडी, चाकण, रांजणगावसह 'पीएमआरडीए'चा 'मास्टर प्लॅन'!

## पाच वर्षांत 33 हजार 700 कोटींचे बूस्टर, औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा 'पीएमआरडीए'च्या वतीने घेण्यात आली.

**पुणे | प्रतिनिधी**

'पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) नागरी सुविधांसह उद्योगांसाठी पायाभूत सुविधांची आखणी करण्यात आली आहे. त्याअंतर्गत पुढील पाच वर्षांत २०८ प्रकल्प हाती घेण्यात येणार असून, ३३ हजार ७०० कोटी रुपयांच्या निधीतून विविध पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात येणार आहे. येत्या काही दिवसांत 'पीएमआरडीए'च्या माध्यमातून यातील ९०० कोटी रुपयांची कामे सुरू होणार आहेत,' अशी माहिती 'पीएमआरडीए''चे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी दिली.

औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा 'पीएमआरडीए'च्या वतीने घेण्यात आली. या वेळी आयुक्त डॉ. म्हसे म्हणाले, 'उद्योग आणि व्यवसायांच्या वाढीसाठी औद्योगिक संघटना आणि उद्योजकांच्या अडचणींचे निराकरण करणे महत्त्वाचे आहे. त्या अडचणी सकारात्मक दृष्टिकोनातून कशा सोडवता येतील, यासाठी तालुका कार्यालय स्तरावर 'पीएमआरडीए' तातडीने पावले उचलत आहे. उद्योजकांचे प्रश्न, अडचणी सोडवण्यासाठी सहायक नगररचनाकार आणि सहायक संचालक यांचा पूर्ण वेळ स्वतंत्र कक्ष सुरू करून उद्योजकांचे प्रश्न निकाली काढण्यात येणार आहेत. यासह तालुका कार्यालयातील अधिकाऱ्यांचे अधिकार वाढवून बांधकाम परवानगी, अग्निशामक ना हरकत प्रमाणपत्रांसह इतर कामकाजात सुसूत्रता आणण्यात येईल.

या कार्यशाळेत चाकण औद्योगिक असोसिएशनचे मोतीलाल सांकला, राजीव रांका, डेक्कन मेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रियल असोसिएशनचे मायकल पीटर, वेस्टर्न महाराष्ट्र एमआयडीसी चेंबर असोसिएशन फेडरेशनचे आप्पासाहेब शिंदे यांच्यासह इतर संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या अडचणी मांडल्या.

### तीन महिन्यांतून एकदा बैठक

» औद्योगिक क्षेत्राचे प्रश्न निकाली काढण्यासाठी 'पीएमआरडीए'च्या माध्यमातून औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची दर तीन महिन्यांतून एकदा बैठक घेऊन त्यांचे प्रश्न सोडवणार आहेत. यासह उद्योग व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी संबंधित ग्रामपंचायत, नगरपालिका, एमआयडीसी आणि 'पीएमआरडीए'च्या माध्यमातून विविध विकासकामे कशी होतील, यासाठी सामूहिक प्रयत्न करणार असल्याचे या वेळी आयुक्तांनी स्पष्ट केले.

> उद्योग व्यवसायाला चालना देण्यासाठी शासन पातळीवर महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जात आहेत. त्याची तातडीने अंमलबजावणी करून 'पीएमआरडीए' हद्दीतील उद्योग आणि व्यवसायांना येणाऱ्या अडचणींसह उद्योजकांच्या समस्या निराकरणासाठी 'पीएमआरडीए' तत्परतेने काम करीत आहे.
>
> - डॉ. योगेश म्हसे, आयुक्त, 'पीएमआरडीए'

# शिवसेना-राष्ट्रवादी युतीच्या तयारीत, तर भाजप 'एकला चलो रे' च्या भूमिकेत

## सासवड नगरपरिषद निवडणुकीचा बिगुल अद्याप वाजलेला नसला तरी शहरात निवडणुकीचे वातावरण तापले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

सासवड नगरपरिषद निवडणुकीचा बिगुल अद्याप वाजलेला नसला तरी शहरात निवडणुकीचे वातावरण तापले आहे. नगराध्यक्ष व नगरसेवक पदांसाठी इच्छुक उमेदवारांनी प्रचारयंत्रणा सज्ज केली असून, पोस्टरबाजी, सोशल मीडिया मोहिमा आणि जनसंपर्क दौऱ्यांनी शहराचे राजकीय तापमान चांगलेच वाढले आहे.यंदा नगराध्यक्ष पद सर्वसाधारण आरक्षणात आल्याने अनेक दिग्गज नेत्यांनी उमेदवारीसाठी जोरदार तयारी सुरू केली आहे.

राजवर्धनी संजय जगताप, वामन जगताप, सचिन भोंगळे, अजित जगताप, साकेत जगताप आणि प्रदीप गिरमे ही नावे सध्या चर्चेत आहेत. काही उमेदवारांनी विकासाच्या मुद्द्यावर मतदारांशी थेट संवाद साधला आहे, तर काहींनी अजूनही आपली राजकीय दिशा ठरवलेली नाही. जातीय आणि कौटुंबिक समीकरणे लक्षात घेता, नगराध्यक्षपदाची लढत बहुरंगी आणि चुरशीची होणार आहे.

सासवड नगरपरिषदेत 11 प्रभागांमधून 22 नगरसेवक निवडले जाणार आहेत. प्रत्येक प्रभागात दोन जागांसाठी उमेदवारांची लगबग सुरू झाली आहे. मनोहर जगताप, मोहन जगताप, गुलाब जगताप, नीलम होले, मनीष रणपिसे, मंगेश भिंताडे, नवनाथ बोरावके, आनंद जगताप, शुभम जगताप, राजेंद्र टकले, अभिजीत कवितके, संदीप राऊत, सोनाली गिरमे, ललित बनकर, संतोष खोपडे, प्रतीक्षा जगताप, मुन्ना शिंदे यांसारखी अनेक नावे स्थानिक राजकारणात चर्चेत आहेत.

शहरात बॅनरबाजी, शक्तिप्रदर्शन आणि सोशल मीडिया मोहिमा सुरू झाल्या आहेत. राजकीय वर्तुळात अशी चर्चा आहे की, सासवडची ही निवडणूक केवळ नगरपरिषदेपुरती मर्यादित न राहता, पुरंदर तालुक्यातील आगामी विधानसभा निवडणुकीचा राजकीय नकाशा ठरवणारी ठरेल. आमदार विजय शिवतारे आणि माजी नगराध्यक्ष गणेश निकुडे यांच्या समन्वयातून आघाडीची तयारी सुरू असल्याचे बोलले जाते. दुसरीकडे, भाजपने स्वबळावर निवडणूक लढविण्याची तयारी दर्शवली असून माजी आमदार संजय जगताप यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्ते संघटन बळकट करण्यावर लक्ष केंद्रित करत आहेत.




### महाविकास आघाडीकडून स्वतंत्र प्रयत्न..

» काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) या महाविकास आघाडीतील पक्षांकडून स्वतंत्र बैठकींचे सत्र सुरू आहे. मात्र आघाडीबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. स्थानिक स्तरावर हे गट वेगवेगळ्या पॅनेल्सच्या माध्यमातून मैदानात उतरतील, अशी शक्यता आहे.

### पुढील राजकीय दिशा सासवड ठरवणार!

» 10 नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होईल. त्याआधीच शहरात बॅनरबाजी, शक्तिप्रदर्शन आणि सोशल मीडिया मोहिमा सुरू झाल्या आहेत. राजकीय वर्तुळात अशी चर्चा आहे की, सासवडची ही निवडणूक केवळ नगरपरिषदेपुरती मर्यादित न राहता, पुरंदर तालुक्यातील आगामी विधानसभा निवडणुकीचा राजकीय नकाशा ठरवणारी ठरेल.

### शिवसेना-राष्ट्रवादी युती चर्चेत..

» सासवडमध्ये शिवसेना (एकनाथ शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यात युती होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. आमदार विजय शिवतारे आणि माजी नगराध्यक्ष गणेश निकुडे यांच्या समन्वयातून आघाडीची तयारी सुरू असल्याचे बोलले जाते. दुसरीकडे, भाजपने स्वबळावर निवडणूक लढविण्याची तयारी दर्शवली असून माजी आमदार संजय जगताप यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्ते संघटन बळकट करण्यावर लक्ष केंद्रित करत आहेत.

# माजी आमदार संग्राम थोपटे यांच्यासमोर भाजपची सत्ता आणण्याचे मोठे आव्हान...

## गेली 17 वर्षे काँग्रेसची सत्ता असलेल्या भोर नगर परिषदेत भाजपला विजय मिळवून देण्याचे मोठे आव्हान आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

भोर नगर परिषदेत गेल्या १७ वर्षांपासून काँग्रेसची सत्ता राहिली आहे. मात्र, काँग्रेसचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने यंदाच्या निवडणुकीत राजकीय समीकरणे बदलली आहेत. या नगर परिषदेत चौरंगी लढतीची शक्यता असून, थोपटे यांच्यापुढे भाजपची सत्ता आणण्याचे आव्हान असणार आहे.

मागील निवडणुकीत काँग्रेसचे माजी आमदार संग्राम थोपटे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे सर्व जागांवर १७ नगरसेवक निवडून आले होते. निर्मला आवारे या नगराध्यक्षपदी मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्या होत्या. मात्र, आता विधानसभा निवडणूक झाल्यानंतर थोपटे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

गेली १७ वर्षे या नगर परिषदेमध्ये काँग्रेसची सत्ता आहे. आता माजी आमदार संग्राम थोपटे यांनी पक्ष बदलल्याने भाजपची सत्ता आणण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे. विद्यमान आमदार शंकर मांडेकर हे सत्ता मिळवण्यासाठी ताकद पणाला लावणार आहेत. राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे विद्यमान आमदार शंकर मांडेकर यांनीही भोर नगर परिषद निवडणुकीकडे लक्ष देण्याचे जाहीर केले आहे. याशिवाय शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) यांचीही येथे ताकद असल्याने त्यांचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असणार आहेत. त्यामुळे भोर नगरपालिकेमध्ये चौरंगी लढतीची शक्यता आहे.

नगराध्यक्षपद हे सर्वसाधारण पुरुष प्रवर्गासाठी राखीव झाल्याने इच्छुकांची संख्या जास्त आहे. यामध्ये भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या पक्षांकडे इच्छुकांची गर्दी आहे. त्यामध्ये माजी उपनगराध्यक्ष रामचंद्र आवारे, माजी नगरसेवक गणेश पवार, संजय जगताप, यशवंत डाळ, माजी नगराध्यक्ष विठ्ठल शिंदे, संदीप शेटे, नितीन सोनावले, जिद्द फाउंडेशनच्या कविता खोपडे यांची नावे चर्चेत आहेत.




### चौरंगी लढतीची शक्यता

» राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे विद्यमान आमदार शंकर मांडेकर यांनीही भोर नगर परिषद निवडणुकीकडे लक्ष देण्याचे जाहीर केले आहे. याशिवाय शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) यांचीही येथे ताकद असल्याने त्यांचे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असणार आहेत. त्यामुळे भोर नगरपालिकेमध्ये चौरंगी लढतीची शक्यता आहे.